# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.
## इंद्रभुवन आंबेडकर चौक,रेल्वे लाईन्स,सोलापूर-४१३००१.
## परवाना विभाग
प्रशासकिय इमारत, तिसरा मजला. ई-मेल-foodandlicenses@gmail.com दुरध्वनी क्र:-


## जाहिरप्रसिध्दीकरण

शहरातील सोलापूर महापालिका कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध व्यवसाय प्रकारातील आस्थापनांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना( नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2018 च्या नियम क्रमांक 35 नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक दुकानाचा प्रथम दर्शनी नामफलक हा मोठ्या अक्षरात मराठी भाषेत अग्रभागी ठळक लिहिलेला असणे अनिवार्य आहे. मे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत आदेशही केलेले आहेत. त्यामुळे सो.म.पा. कार्यक्षेत्रातील विविध व्यवसाय प्रकारातील आस्थापनांनी दुकानाचा प्रथमदर्शनी नामफलक मराठी देवनागरी लिपीत सत्वर लिहिण्याची कार्यपद्धतीची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

व्यावसायिकांनी दुकानाचा प्रथमदर्शनी नामफलक मराठी देवनागरी लिपीत नमूद करणेबाबत खालील प्रमाणे अंमलबजावणीची दक्षता घ्यावी.

1) आस्थापनेच्या नावाचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपीत लावलेलाअसावा.

2) आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपी बरोबरच आणखी इतर भाषेनही लिहू शकतो. तथापि मराठी भाषेतील नाम फलकावरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये.

3) आस्थापनेचा नावाचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपीत लावावा त्याचे अक्षरलेखन करताना नाम फलकाची सुरुवातही मराठी भाषेतील अक्षर लेखनापासून करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त नमूद बाबींचे आपला व्यवसाय नाम फलक लावताना दक्षता घेणे आवश्यक आहे. याबाबत समक्षतेत पाहणी दरम्यान नमूद नियमांचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालयामार्फत महाराष्ट्र दुकाने व आस्थापना( नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन )अधिनियम 2018 अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

आरोग्याधिकारी
सोलापूर महानगरपालिका

जाक्र.१/आ.अ/अपवि/९२४
आरोग्याधिकारी यांचे कार्यालय
दि.२४/११/२०२३